दि.१ सप्टेंबर ते ३१ ऑक्टोबर, २०१९ पर्यंतच्या कालावधीत अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झालेल्या/होणाऱ्या व्यक्तींना मदत देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
शासन निर्णय,क्रमांक: सीएलएस-२०१९/प्र.क्र.१७५/म-३
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ११ सप्टेंबर, २०१९

संदर्भ : १) शासन निर्णय, महसुल व वन विभाग, क्रमांक: सीएलएस-२०१५/प्र.क्र.४०/म-३, दिनांक: १३.५.२०१५
२) शासन निर्णय,महसुल व वन विभाग, क्रमांक: सीएलएस-२०१९/प्र.क्र.१५७/म-३ दिनांक: ८.८.२०१९
३) शासन निर्णय,महसुल व वन विभाग, क्रमांक: सीएलएस-२०१९/प्र.क्र.१६५/म-३ दिनांक: २९.८.२०१९
४) शासन निर्णय,महसुल व वन विभाग, क्रमांक: सीएलएस-२०१९/प्र.क्र.१६५/म-३ दिनांक: ११.९.२०१९

प्रस्तावना:

जुलै-ऑगस्ट,२०१९ या कालावधीत राज्यात विविध जिल्हयात अतिवृष्टी झाल्यामुळे पुरपरिस्थिती उद्भवली आहे. दिनांक १ ऑगस्ट ते ९ ऑगस्ट, २०१९ या कालावधीत पुणे, सातारा, सांगली व कोल्हापूर या जिल्हयामध्ये अनुक्रमे सरासरीच्या ४०१ %, ६१८%, ७५८ %, व ४८० % इतक्या मोठया प्रमाणात अतिवृष्टी झाली. सदर अतिवृष्टीमुळे या जिल्हयांतील शहरी व ग्रामीण भागात अभुतपूर्व अशी पुरपरिस्थिती निर्माण झाली होती. या पुरपरिस्थितीमुळे सामान्य जनजीवन मोठया प्रमाणात विस्कळीत होवून मालमत्तेचेही मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या व्यक्तींना मदत करण्यासंदर्भात संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक २, ३ व ४ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सप्टेंबर च्या पहिल्या व दुसऱ्या आठवडयात राज्यातील काही भागात अतिवृष्टी व पुरपरिस्थिती निर्माण होवून नागरिकांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे सप्टेंबर व ऑक्टोबर २०१९ या कालावधीत राज्यातील विविध भागात अतिवृष्टी व पुरपरिस्थितीमुळे बाधित झालेल्या/होणाऱ्या व्यक्तींना मदत देण्याबाबतच्या विषयावर दिनांक ९.९.२०१९ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा करण्यात आली. जुलै-ऑगस्ट, २०१९ या महिन्यामध्ये राज्यात अतिवृष्टी व पुर या घटनांमुळे बाधित झालेल्या व्यक्तींना मदत देण्याबाबतचे जे शासन निर्णय घेण्यात आले आहेत ते सर्व शासन निर्णय याप्रकरणीही लागू करण्यात यावेत असा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. त्यानुसार शासन आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

दिनांक १ सप्टेंबर ते ३१ ऑक्टोबर २०१९ या कालावधीत राज्यातील विविध भागात अतिवृष्टी व पुरपरिस्थितीमुळे नागरिकांच्या झालेल्या/होणाऱ्या नुकसानीसाठी संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक २, ३ व ४ अन्वये लागू करण्यात आलेल्या सवलती व मदत या प्रकरणीही लागू करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. या निर्णयानुसार अनुज्ञेय करण्यात आलेल्या विविध सवलती व मदत नवीन क्षेत्रासाठी लागू होतील काय याची **तपासणी काटेकोरपणे करण्यात यावी व संबंधित विभागीय आयुक्त यांच्या मान्यतेनंतरच हा शासन निर्णय अशा क्षेत्रासाठी लागू करण्यात यावा**.

३. सदर शासन निर्णय एक विशेष बाब म्हणून निर्गमित करण्यात येत असून तो सप्टेंबर-ऑक्टोबर २०१९ या कालावधीत राज्यात झालेल्या/होणाऱ्या अतिवृष्टी व पुरपरिस्थितीमुळे बाधित झालेल्या/होणाऱ्या भागाकरिताच लागू राहील.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक:३६९/२०१९/व्यय-९, दिनांक ११.९.२०१९ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०९१११८५२५६३३१९ असा आहे. हे आदेश डिजिटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Subhash Hanmant Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d5ea2bb9565eeb9b02d583f130371941a03fc5d98df65d3daafe66960a165024, serialNumber=596a24adfcfcd3edb4245812c0eaccecdf4de3ec6a308b42a682a980bca4db38, cn=Subhash Hanmant Umaranikar
Date: 2019.09.11 19:03:36 +05'30'

(सु.ह.उमराणीकर)
उपसचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई,
२. मा. विरोधी पक्ष नेता (विधानसभा/विधान परिषद), विधानमंडळ सचिवालय,मुंबई,
३. महाराष्ट्र विधानमंडळाचे सर्व सन्माननीय विधान सभा/विधान परिषद सदस्य,
४. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय,मुंबई,
५. अपर मुख्य सचिव (महसुल), महसुल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई
६. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय,मुंबई
७. प्रधान सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग,बांधकाम भवन, मुंबई
१०. प्रधान सचिव (नवि-२),नगर विकास विभाग,मंत्रालय, मुंबई
११. सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग,मंत्रालय, मुंबई
१२. अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव,सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,मंत्रालय,मुंबई
१३. सर्व विभागीय आयुक्त,
१४. आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य, पुणे
१५. सर्व जिल्हाधिकारी,
१६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१७. महालेखापाल (लेखा परिक्षा) १/२,महाराष्ट्र,मुंबई/नागपूर,
१८. संचालक, लेखा व कोषागारे ,मुंबई

१९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२०. मा.मंत्री(मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
२१. वित्तिय सल्लागार व सहसचिव,मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
२२. कार्यासन अधिकारी (म-११/म-३), मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
२३. वित्त विभाग (कार्यासन व्यय-९/अर्थ-६),मंत्रालय,मुंबई
२४. निवड नस्ती (कार्यासन/ म-३)